राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांतर्गंत कार्यरत असलेल्या आपत्कालीन कार्य केंद्रात कंत्राटी कर्मचा-यांची नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल वन विभाग (मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्रमांक :- आव्यप्र-२०१८/प्र.क्र. ७३/आव्यप्र-१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २० मार्च, २०१९

<u>प्रस्तावना :-</u>

राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांतर्गत कार्यरत असलेल्या आपत्कालीन कार्य केंद्रात १३ कत्राटी पदांच्या निर्मितीस उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता प्राप्त झाली आहे. या १३ पदांपैकी ९ऑपेटर्सची पदे भरण्याकरीता दिनांक ७ मार्च, २०१९ रोजी यशदा, पुणे येथे लेखी परीक्षा आणि मुलाखती घेण्यात आल्या असून लेखी परीक्षा आणि मुलाखतीच्या माध्यमातून एकूण ९ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे.

निवड झालेल्या ९ उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी दिनांक १८.०३.२०१९ रोजी करण्यात आली. या छाननीत सर्व ९ उमेदवार कंत्राटी नियुक्ती देण्यासाठी पात्र ठरल्याने त्यांना नियुक्ती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांतर्गत कार्यरत असलेल्या राज्य आपत्कालीन कार्य केंद्रात खालील ९ उमेदवारांची मंत्रालय नियंत्रण कक्ष ऑपरेटर या पदावर दिनांक २० मार्च, २०१९ ते दिनांक १९ फेब्रुवारी, २०२० या ११ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) श्री. अनिस आयुब बागवान
२) श्री. सुनिल शंकर गायकवाड
३) श्री. श्रीकृष्ण भालचंद्र देशपांड
४) श्री. ओंकार राजीव नवलीहाळकर
५) श्री. प्रसाद नामदेव दळवी
६) श्री. सागर प्रभाकर वाळूंज
७) श्री. समिर चंद्रकांत कुडतरकर
८) श्री. योगेश संतोष मोरये
९) श्री. बाळू दौलत आढांगळे

वरील उमेदवारांची नियुक्ती ही पूर्णपणे कंत्राटी आणि वर नमूद केलेल्या कालावधीसाठी नियुक्ती असून त्यांना या नियुक्तीमुळे शासकीय सेवेत कायम पदाचे कोणतेही लाभ / अधिकार अनुज्ञेय नाहीत.

वरील उमेदवारांनी मंत्रालय नियंत्रण कक्ष, १ ला मजला, मुख्य इमारत मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे तात्काळ रुजू व्हावे.

वरील उमेदवारांना मंत्रालय नियंत्रण कक्षत शिफ्टमध्ये काम करावे लागेल.

वरील उमेदवारांना आपत्ती व्यवस्थापन प्रभागामार्फत आयोजित करण्यात आलेले प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण करणे बंधनकारक आहे. प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण न केल्यास संबंधित उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

मंत्रालय नियंत्रण कक्ष ऑपरेटर या नियुक्त करण्यात आलेल्या अमेदवारास दरमहा रु. २५०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) एवढे एकत्रित मानधन देण्यात येईल. सेवानिवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना प्रचलित शासन निर्णयानुसार शेवटच्या वित्तलब्धी मधून सेवानिवृत्ती वेतन वजा करुन उर्वरित रक्कम एकत्रित मानधन म्हणून देण्यात येईल. मात्र त्याची मर्यादा कमाल रु. ३००००/- (रुपये तीस हजार फक्त) एवढी राहील . त्याना इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय नाहीत.

वरील उमेदवारांना आपत्ती व्यवस्थापन प्रभागात बंधपत्र देणे बंधनकारक आहे.

आपत्ती व्यवस्थापन प्रभागाने मंत्रालय नियंत्रण कक्षाच्या कामानिमित्त दौ-यावर पाठविल्यास वर्ग-३ शासकीय कर्मचा-यास अनुज्ञेय असलेल्या दराने त्यांना प्रवास खर्च अनुज्ञेय असेल.

या कर्मचा-यांना वरील ११ महिन्याच्या कालावधीत ०७ किरकोळ रजा अनुज्ञेय असतील. इतर कोणतीही रजा देण्यात येणार नाही. अनुज्ञेय ०७ किरकोळ रजेपेक्षा जास्त झालेल्या अनुपस्थितीबद्दल जादा झालेल्या दिवसांचे मानधन त्यांना देय असलेल्या ठोक मानधनातून वजा करण्यात येईल.

नियुक्त करण्यात आलेल्या वरील ऑपरेटरचे काम समाधानकारक नसल्यास त्यांच्या कत्राटी सेवा केव्हाही समाप्त करण्याचा अधिकार आपत्ती व्यवस्थापन प्रभागास असेल.

नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने एक महिन्याची नोटीस द्यावी. किंवा त्याला मिळणारे एक महिन्याचे मानधन (रु. २५,०००/- व रु. ३०,०००/-) आपत्ती व्यवस्थापन प्रभागाकडे जमा करणे आवश्यक आहे.

या कामी होणारा खर्च लेखाशिर्ष क्रमांक २२४५ १७६१ मध्ये ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या उद्दिष्टांतर्गत दरवर्षी अर्थसंकल्पित होणा-या तरतूदीतून करण्यात येईल.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३२५१५५८२९५९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढयात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIRANG SHRIPATI GHOLAP

Digitally signed by SHRIRANG SHRIPATI GHOLAP
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9a2bc3b45be4b89f7c46c4474cf90b8a3c477e34c064494b04238ca50ee43db6, postalCode=400032, street=1ST FLOOR MAIN ROAD, MANTRALAYA, ou=REVENUE AND FOREST DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRIRANG SHRIPATI GHOLAP
Date: 2019.03.25 16:02:32 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखाकार, महाराष्ट्र - १, मुंबई
२) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
३) लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई
४) सर्व मंत्रालयीन विभाग.
५) नियुक्त करण्यात आलेले वरील सर्व उमेदवार
६) निवड नस्ती.